खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२–२३

### क्रीडा स्पर्धा

पुढारी

# राजगुरू महाविद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत यश

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात नुकत्याच पार पडलेल्या पुणे जिल्हा क्रीडा विभाग समिती अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन मैदानी मुले व मुली स्पर्धांमध्ये हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने विजेतपद प्राप्त केले. दोन्ही संघांनी ८ सुवर्ण, २ रौप्य आणि ३ कांस्यपदकांची कमाई करून सर्वसाधारण विजेतपद मिळविले.

संगीता शिंदे हिने ४०० मीटर धावणे, ४०० मीटर हर्डल्स, ८०० मी, ४ ×१०० रिले, ४ ×४०० रिले यात ३ वैयक्तिक व २ सांघिक सुवर्णपदके, ऐश्वर्या खळदकर हिने २१ किमी धावणेत सुवर्णपदक, १०००० मी धावणेत रौप्य, ४ ×१०० रिले, ४×४०० रिलेत २ सांघिक सुवर्णपदके, अक्षय दरेकर याने भालाफेक, बांबू उडीत २ सुवर्णपदके पटकावली.



**हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेतील यशस्वी.**

संदेश डांगले याने बांबू उडीत रौप्यपदक, जगदीश दरेकर याने भालाफेकीत कांस्यपदक, कोमल सावंत हिने ४०० मीटरमध्ये कांस्यपदक, ४×४०० रिलेत सांघिक सुवर्णपदक, रोहिणी पुंडगे याने लांब उडीत कांस्यपदक, ४ ×१०० रिले व ४ ×४०० रिलेत २ सांघिक सुवर्णपदके आणि कांचन सावंत हिने ४ ×१०० रिलेत सांघिक सुवर्ण पदककाची कमाई केली.

या सर्व खेळाडूंची आंतरविभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंचे व क्रीडा संचालक प्रा. प्रतिमा लोणारी यांचे अभिनंदन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले आहे.

My Gramin Edition
Nov 18, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# राजगुरू महाविद्यालयाचे विविध क्रीडा स्पर्धांमध्ये यश

## मैदानी स्पर्धेत मुलीच्या संघाला विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा संकुलाच्या सिंथेटिक ट्रॅकवरती १३ ते १५ नोव्हेंबरदरम्यान झालेल्या पुणे जिल्हा क्रीडा विभाग समितीअंतर्गत आंतरमहाविद्यालयीन मैदानी मुले व मुली स्पर्धांमध्ये हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने विजेतेपद प्राप्त केले.

मुले व मुली या दोन्ही संघांनी ८ सुवर्ण, २ रौप्य आणि ३ कांस्यपदकांची कमाई करून सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले.

संगीता शिंदे हिने ४०० मी. धावणे, ४०० मी. Hurdles, ८०० मी. ४ १०० रिले, ४x४०० रिले यात ३ वैयक्तिक व २ सांघिक सुवर्णपदके, ऐश्वर्या खळदकर हिने २१ किमी धावणेत सुवर्णपदक, १०००० मी. धावणेत रौप्य, ४ १०० रिले, ४x४०० रिलेत २ सांघिक सुवर्णपदके, अक्षय दरेकर याने भालाफेक, बांबूउडीत २ वैयक्तिक सुवर्णपदके, संदेश डांगले याने बांबूउडीत १ वैयक्तिक रौप्यपदक, जगदीश दरेकर याने भालाफेकीत १ वैयक्तिक कांस्यपदक, कोमल सावंत हिने ४०० मी. धावण्यात कांस्यपदक, ४x४०० रिलेत सांघिक सुवर्णपदक, रोहिणी पुंडगे याने लांबउडीत कांस्यपदक ४ १०० रिले व ४x४०० रिलेत २ सांघिक सुवर्णपदके आणि कांचन सावंत

हिने ४x१०० रिलेत सांघिक सुवर्णपदकाची कमाई केली.

या सर्व खेळाडूंची १७ ते १९ नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या आंतरविभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंचे व क्रीडा संचालक प्रा. प्रतिमा लोणारी यांचे अभिनंदन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले आहे.

Hello Pune Gramin
Page No. 4 Nov 18, 2022

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभागप्रमुख**